खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## अकरावी प्रवेश प्रक्रिया

### राजगुरू महाविद्यालयात अकरावी प्रवेश सुरू

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व तंत्र विभागाची प्रवेश प्रक्रिया दि. २९ मे पासून सुरू झाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता अर्ज भरून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी महाविद्यालयात शाखानिहाय समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेश फीचे चलन भरण्यासाठी महाविद्यालयात राजगुरुनगर सहकारी बँकेचे काउंटर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अकरावी विज्ञान व वाणिज्य शाखेसाठी दि. ८ जून रोजी गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. तर कला व व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी थेट प्रवेश सुरू आहेत. विद्यार्थ्यांनी www.hrm.corecampus.in या वेबसाईटवर जाऊन फॉर्म भरावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.

दै. पुढारी

वर्ष : १४४
केसरी

# राजगुरू महाविद्यालयात अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू

**राजगुरूनगर, (वार्ताहर)** : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व तंत्र विभागाची प्रवेश प्रक्रिया २९ मेपासून सुरू झाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता अर्ज भरून आपला प्रवेश निश्चित करावा. असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी महाविद्यालयात शाखानिहाय समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले असून विद्यार्थ्यांना प्रवेश फीचे चलन भरण्यासाठी महाविद्यालयात राजगुरुनगर सहकारी बँकेचे काउंटर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अकरावी विज्ञान व वाणिज्य शाखेसाठी ८ जून रोजी गुणवत्ता यादी लागणार असून कला व व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी थेट प्रवेश सुरू झाले आहेत. विद्यार्थ्यांनी www.hrm.corecampus.in या वेबसाईटवर जाऊन मेरीडचा फॉर्म भरावा, अशी माहिती प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी दिली.

दै. केसरी

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**